कार्यालये लवकर सोडण्यास
<u>परवानगी देण्याबाबत.</u>
**मंत्रालय व बृहन्मुंबईतील इतर शासकीय कार्यालये.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक जीएडी-१८०१२/११/२०२६-जीएडी (रवका-१) (ई-१७४०९१८).**
मंत्रालय (विस्तार इमारत), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई. पिन ४०००३२.
दिनांक: ०६ जुलै, २०२६

**परिपत्रक.**

भारतीय हवामान विभागाने (IMD) मुंबई महानगर क्षेत्रासाठी अतिवृष्टीचा इशारा (Red Alert) जारी केला असून ताशी ८० ते ९० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष या नात्याने मा. मुख्यमंत्री महोदयांनी मुंबईतील वादळी वारे व पावसाची सद्यःस्थिति विचारात घेता दि.०६/०७/२०२६ करिता खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत-

१. शासनातील अत्यावश्यक विभाग वगळता अर्ध्या दिवसानंतर कार्यालये सोडण्यात यावीत.
२. सर्व खाजगी कार्यालये यांनी Work From Home करावे.

ही बाब लक्षात घेता, मंत्रालय आणि बृहन्मुंबईतील सर्व शासकीय कार्यालयांमधील अधिकारी व कर्मचारी यांना, सोमवार, दिनांक ०६ जुलै २०२६ रोजी, अर्ध्या दिवसाने कार्यालय सोडण्यास, याद्वारे, पुढील अटींवर, परवानगी देण्यात येत आहे:-

अटी:-

१. शासनातील अत्यावश्यक सेवेशी संबंधित कार्यालयांमधील अधिकारी व कर्मचारी यांच्याबाबतीत संबंधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख हे निर्णय घेतील.
२. इतर कार्यालयांच्या बाबतीत, तातडीचे अथवा कालमर्यादित काम असल्यास असे काम पार पाडण्यासाठी जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांच्याबाबतीत संबंधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख हे निर्णय घेतील.
३. सर्व खाजगी कार्यालये यांनी Work From Home करावे.

२. हे शासन परिपत्रक, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६०७०६१२३५५४११०७ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by ATUL NILKANTHRAO PATNE
Date: 2026.07.06 14:54:49 +05'30'

**(डॉ. अतुल पाटणे)**
**प्रधान सचिव**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, लोकभवन, मुंबई.

२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधानभवन, मुंबई.

४) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधानभवन, मुंबई.

५) मा. उप मुख्यमंत्री, नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

६) मा. उप मुख्यमंत्री, राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

७) सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

८) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.

९) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.

१०) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

११) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.

१२) जिल्हाधिकारी, मुंबई शहर/मुंबई उपनगर.

१३) बृहन्मुंबईतील सर्व शासकीय कार्यालये (संबंधित प्रशासनिक विभाग यांच्यामार्फत).

**प्रत-**

१) मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

२) प्रधान सचिव (प्र.ना.उ. व सुशासन) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

३) सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/ कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

४) निवड नस्ती, रवका-१.